**कामगार न्यायालय, बुलढाणा.**
**(श्री. शार्दुल श. जहागिरदार, न्यायाधीश)**

**न्यायालय अवमान तक्रार क्रं. ११/२०२४**

**वसंता राजाराम बावणे**
वय ६६ वर्षे, धंदा-सेवानिवृत्त,
रा. खामगाव, ता. खामगाव
जि. बुलढाणा .....**तक्रारदार**

**-विरुध्द-**

१. **बी. एम. मोहन,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जि. प. बुलढाणा.

२. **मदनसिंग तुराबसिंग राजपूत,**
गटविकास अधिकारी, खामगाव,
जि. बुलढाणा. .....**प्रतिवादी/आरोपी**

**निशाणी क्रं. यु-१ वर आदेश**

१) तक्रारदारांनी प्रस्तुतची न्यायालयीन अवमान आदेशाची तक्रार दाखल केली असून असे कथन केले आहे की, या प्रकरणातील प्रतिवादी/आरोपी ह्यांनी विद्यमान औद्योगिक न्यायालय, अकोला ह्यांनी युएलपी क्रं. ५२/२००६ या प्रकरणामध्ये पारित केलेल्या आदेशाचे मुद्दाम पालन केले नाही, ज्यामुळे न्यायालयीन आदेशाचा अवमान

झाला. तक्रारदार पुढे असे म्हणतात की, मा. औद्योगिक न्यायालय, अकोला ह्यांनी दि. ०२/०१/२०१८ रोजी प्रतिवादी/आरोपी ह्यांच्या विरूध्द तक्रार युएलपी क्रं. ५२/२००६ मध्ये न्यायनिर्णय पारित आणि त्याची अंमलबजावणी करण्यात त्यांना अपयश आल्यामुळेच प्रस्तुतची न्यायालय आदेश अवमान तक्रार दाखल केली आणि ह्यामध्ये गुणदोषावर निर्णय होणेकरीता प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये प्रतिवादी/आरोपी ह्यांच्याविरूध्द 'इश्यु प्रोसेसचा आदेश' पारित होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केलेले आहे.

२) या प्रकरणात हजर होवून प्रतिवादी/आरोपी यांनी नि. क्रं. सी-४ खाली आपले विस्तृत म्हणणे सादर केले असून असे कथन केले आहे की, ह्या प्रकरणामध्ये मा. औद्योगिक न्यायालय, अकोला ह्यांनी पारित केलेला न्यायनिर्णय हा मा. उच्च न्यायालय नागपुर ह्यांनी सुध्दा कायम ठेवला असून, ह्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत, म्हणून शिक्षण संचालक, पुणे ह्यांच्या कडून अनुदान प्राप्त होताच तक्रारदारांना देण्यात येईल, त्यामुळे ही तक्रार फेटाळण्यास पात्र ठरते.

३) तक्रारदार आणि प्रतिवादी/आरोपी ह्यांचे एकमेकांविरोधात कथन आणि युक्तिवाद आणि त्याचप्रमाणे अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, तक्रारदारांच्या ह्या युक्तिवादामध्ये पुर्ण तथ्य आहे की, त्यांच्या हक्कामध्ये मात्र औद्योगिक न्यायालय ह्यांनी दि. ०२/०१/२०१८ रोजी न्यायनिर्णय पारित करून सुध्दा अजूनपर्यंत त्याची अंमलबजावणी करण्यात प्रतिवादी/आरोपी

ह्यांना यश आलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण पुढे चालविण्याकरीता इश्यु प्रोसेसचा आदेश होणे आवश्यक ठरते, म्हणून खालील आदेशपारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येत असून, तक्रारदारांनी इश्यु प्रोसेस करीता आवश्यक असलेले न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा केल्यानंतर या प्रकरणातील सर्व प्रतिवादी/आरोपी ह्यांनी न्यायालयात हजर राहावे म्हणून नियमानुसार समन्स निर्गमित करावे असे न्यायालय लिपीक ह्यांना निर्देशीत करण्यात येत आहे.

**स्वा/-**

**दिनांक :- २५/०२/२०२५**

**ठिकाण :- बुलढाणा.**

**(शार्दुल श. जहागिरदार)**
**न्यायाधीश,**
**कामगार न्यायालय, बुलढाणा.**